Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे अध्ययन

**राजेश्वर वारलु काकडे[1], डॉ. विठ्ठल एन. ठावरी[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, नेवजाबई हितकरणी महाविद्यालय,ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर
[2]मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी, ता. चिमूर, जि. चंद्रपूर
**Email:** rajeshwarkakde@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171211
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 62-68
December 2025

**Submitted:** 16 Nov. 2025
**Revised:** 26 Nov. 2025
**Accepted:** 11 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***गोषवारा***

*भारत सरकारने सन २०१५ मध्ये सुरू केलेली प्रधानमंत्री आवास योजना हे ग्रामीण व शहरी क्षेत्रातील बेघर अथवा अपुरी राहणीमान असलेल्या कुटुंबांना सुरक्षित, टिकाऊ आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याकरिता राबवण्यात आलेली एक महत्त्वाची केंद्रीय पुरस्कृत राष्ट्रीय योजना आहे. "सबका साथ, सबका विकास" या धोरणात्मक दृष्टिकोनातून प्रेरित झालेली ही योजना सामाजिक न्याय, आर्थिक सक्षमीकरण आणि सर्वांगीण विकासाला चालना देणारी ठरत आहे. या अभ्यासामध्ये PMAY अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी, योजना मिळवण्याची प्रक्रिया, मिळालेल्या घरांचा दर्जा, लाभार्थ्यांनी अनुभवलेले फायदे, तसेच अडचणी यांचा समावेश करून योजना प्रत्यक्षात कितपत परिणामकारक ठरली आहे याचे विश्लेषण केले जाते. ग्रामीण आणि शहरी दोन्ही विभागातील लाभार्थ्यांच्या निवारा-सुरक्षेतील सुधारणा, जीवनमानात झालेला बदल, आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा या घटकांचाही अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.*

***शब्दसंकेत:*** *गृहनिर्माण धोरण, आर्थिक दुर्बल घटक, सरकारी अनुदान, मूलभूत सुविधा, सामाजिक व आर्थिक समानता, ग्रामीण विकास.*

## प्रस्तावना

प्रधानमंत्री आवास योजना ही कल्याणकारी योजना म्हणून ओळखल्या जात आहे. प्रत्येक गोर- गरीब व्यक्तींचा विकास साध्य करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. आपल्या देशाने "कल्याणकारी राज्य" या संकल्पनाचा स्वीकार केल्यामुळे प्रत्येक जनतेला सुख- समृद्धी प्राप्त करून देऊन सर्वसमावेशक विकासात त्यांना सहभाग करून घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे. कल्याणकारी राज्य या संकल्पनेला न्याय देण्यासाठी जे लोक आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहे, स्वतःचे पक्के घर बांधू शकत नाही अशा लोकांना सरकार आर्थिक पाठिंबा देऊन त्यांचे स्वतःचे घराचे स्वप्न पूर्ण पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना २०१५ पासून सुरू करण्यात आलेली आहे. घर मनुष्याला समाजात एक महत्वपूर्ण आर्थिक सुरक्षा व सामाजिक दर्जा प्राप्त करून देतात. मनुष्य जीवन जगत असताना अन्न, वस्त्र, निवारा या त्यांच्या प्रमुख गरजा आहे. या गरजा पूर्ण करण्यासाठी मनुष्य आपल्या आयुष्यात कार्यरत असतो. निवारा ही मानवाची अन्न व वस्त्र त्यानंतरची मूलभूत गरज आहे. आनंदित व तणाव विरहित जीवन जगण्यासाठी एक चांगला निवारा अत्यंत महत्त्वाचा असतो. निवारा व्यक्तीसाठी स्थैर्य उपलब्ध करून देऊन त्यास कौटुंबिक व सामाजिक जीवनात भाग घेण्यास सक्षम बनवितो. मनाची शांतता व आनंदात हातभार लागल्याने व्यक्तींची उत्पादकता वाढते. प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र पुरस्कृत असून देशातील गरीबी निर्मूलन करण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे. या योजना अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील बेघर, आर्थिक मागास, विधवा, वृद्ध व अपंग जनतेला आवास उपलब्ध करून देणे, झोपडपट्टीचे व बेघरांचे प्रमाण कमी करणे, शहरी व ग्रामीण भागाच्या विकास करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*राजेश्वर वारलु काकडे, संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, नेवजाबई हितकरणी महाविद्यालय,ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर*

**How to cite this article:**
*काकडे, . राजेश्वर . वारलु ., & ठावरी, . विठ्ठल . एन . (2025). चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे अध्ययन. Journal of Research and Development, 17(12(A)), 62–68.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18183734*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18183734
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

मानवाच्या इतिहासापासूनच आज पर्यंत भेडसावत आलेली ही एक गरज आहे की ज्यामुळे मानवाच्या संपूर्ण आयुष्याची जडण- घडण ही घरामुळे झालेली दिसून येते. मानवी जीवनात एक महत्त्वाचे स्थान व स्थैर्य म्हणून पाहिले असता असे दिसून येते की वर्तमानात वेगाने होणारे नागरीकरण यामुळे निवारा ही बाब आव्हानात्मक बनलेली आहे. परंतु हे एक मूलभूत गरज होय म्हणून घरांच्या गरजेचा विचार घेणे संयुक्तिक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १७,७३०४० इतके कुटुंब बेघर आहेत. तसेच या जनगणनेनुसार शहरी भागात ५२.९ टक्के तर ग्रामीण भागात ४७.१ टक्के एवढी लोकसंख्या आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार २,१०,९०८ कुटुंबे बेघर आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यामुळे व आर्थिक समता नसल्यामुळे निवासांचा प्रश्न निर्माण होतो, अनेक कुटुंबे मिळेल तिथे निवारा करतात, फूटपाटवर रात्र काढतात ही समस्या अनेक राज्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात दिसून येते.

**संशोधनाचा उद्देश्य**

सदर शोध निबंधात प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा अध्ययन करण्यात येत आहे, त्या अनुषंगाने पुढील उद्देश्य निश्चित करण्यात आले आहे.

१) प्रधानमंत्री आवास योजना वरील खर्चाचा परीक्षण करणे.

२) प्रधानमंत्री आवास योजनामुळे लाभार्थ्यावर झालेल्या परिणामाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधात द्वितीय साधन सामग्रीत प्रकाशित व अप्रकाशित झालेल्या साधनांचा वापर केला आहे. यामध्ये जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, आर्थिक सर्वेक्षण, विविध वर्तमानपत्रे तसेच काही संकेतस्थळावर प्रकाशित माहितीचा सुद्धा वापर करण्यात आलेला आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेचा पूर्व इतिहास**

प्रधानमंत्री आवास योजना म्हणजे स्त्री-पुरुषांना भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अंतर्भूत असलेल्या निवाराचा समान हक्क मान्य करण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल होय. शहरी झोपडपट्टी व ग्रामीण भागातील आर्थिक मागास, बेघर, महिला, वृद्ध व अपंग ज्यांना राहण्यासाठी घर नसून त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये, राहणीमानाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारने आवास योजना सुरू केलेली आहे. स्वातंत्र्यानंतर स्थलांतरित लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी भारतात एक आवाज कार्यक्रम १९५७ ला सुरू करण्यात आला त्याचे नाव व्हिलेज हाऊसिंग प्रोग्राम (VHP) आहे. वर्ष १९६० पर्यंत भारतात विविध भागात जवळपास पाच लाख कुटुंबाला घरी उपलब्ध झाली. या कार्यक्रमांतर्गत लोकांना व सहकारी समित्यांना प्रतिक कुटुंब पाच हजार रुपये पर्यंत कर्ज दिले गेले. पाचवी पंचवार्षिक योजनेच्या शेवटपर्यंत योजना अंतर्गत फक्त ६७ हजार आवास निर्माण केले गेले.जून १९८५ इंदिरा आवास योजना सुरू करण्यात आली. १ जानेवारी १९९६ पासून इंदिरा आवास योजना स्वतंत्रपणे सुरू करण्यात येऊन त्यामध्ये गैर अनुसूचित जाती, जमाती व दारिद्र्य रेषेखाली लोकांचा समावेश करण्यात आला आहे. वर्ष २०१५ पासून इंदिरा आवास योजना हे नाव बदलून केंद्र सरकार मार्फत प्रधानमंत्री आवास योजना हे नवीन नाव या योजनेला देण्यात आले तसेच या योजनांमध्ये घरबांधणीसाठी मैदानी क्षेत्रात १ लाख २० हजार रुपये व पूर्वोत्तर राज्यासाठी पहाडी क्षेत्रात राहणाऱ्या लोकांसाठी १ लाख ३० हजार रुपये आर्थिक मदत केली जाते.

**चंद्रपूर जिल्हा विषयक:**

चंद्रपूर हे नाव प्रचलित असलेला हा जिल्हा प्राचीन काळी 'लोकापुरा' या नावाने ओळखला जात असे. याचेच नामांतर काही काळानंतर 'इंदापूर' आणि त्यानंतर चंद्रपूर असे झाले. ब्रिटिशांच्या कारकिर्दीत हा जिल्हा 'चांदा' या नावाने ओळखला जात होता. सन १९६४ मध्ये चांदा हे नाव बदलून पुन्हा चंद्रपूर असे करण्यात आले. या प्रदेशावर बऱ्याच काळापर्यंत हिंदू आणि बौद्ध राजाची सत्ता होती. या भागावर राज्य करीत असलेल्या वैरागडच्या माना राजाकडून ९व्या शतकात गोंड राज्याने सत्ता हस्तगत केली. सन १२४० ते १७५१ येथे मराठ्यांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत गोंड राजाचीच सत्ता होती. मराठे राजे रघुजी भोसले हे सन १८५३ मध्ये विनावारस मृत्यू पावल्यानंतर नागपूर प्रांताचे चंद्रपूर हे ब्रिटिश साम्राज्याला जोडण्यात आले.

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा म्हणून गणला जाऊ लागला. यावेळी जिल्ह्यात एकूण ६ तालुके होते. सध्या परिस्थितीत चंद्रपूर जिल्ह्यात एकूण १५ तालुके असून १ महानगरपालिका, ६ नगरपालिका, १५ पंचायत समित्या, ८२७ ग्रामपंचायत व गट ग्रामपंचायत आहे.

**भौगोलिक स्थान**

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याचा दक्षिण व पूर्व भागात १८.४ सेल्सिअस ते २०.५ सेल्सिअस उत्तर अक्षांशवर व ७८.५ सेल्सियस ते ८०.६ सेल्सिअस या पूर्व रेखांश भौगोलिक पट्ट्यामध्ये वसला आहे. जिल्ह्यात उत्तरेला वर्धा, नागपूर व भंडारा हे जिल्हे असून पूर्वेस गडचिरोली जिल्हा आहे. दक्षिणेस तेलंगणा मधील आदिलाबाद जिल्हा असून पश्चिमेस यवतमाळ जिल्हा आहे. पूर्व सीमा वेनगंगा नदीने मर्यादित करून पश्चिम व दक्षिण सीमेचे रेखांकन वर्धा व पैनगंगा नद्या व माणिक टेकड्यांनी केलेला आहे. निसर्गाने चंद्रपूर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

जिल्ह्याला समृद्ध व सुपीक जमीन नियमित वाहणाऱ्या मोठ्या नद्या व नाले तसेच ४२ टक्के क्षेत्र व्यापणारी हिरवीगार वनश्री विपुल सूर्यप्रकाश आणि खनिज संपत्तीचे भव्य साठे त्याचे वरदान दिले आहे.

**प्राकृतिक रचना**

जिल्ह्याच्या उत्तरेकडील भाग हा दक्षिणेकडील भागाच्या मानाने काहीसा रुंद आहे. स्वाभाविकरीत्या जिल्ह्याचे खालील भाग पडतात (१) मूल-चिमूर टेकड्याचा भाग (२) वर्धा वैनगंगा नद्याचे सखोल मैदान (३) चांदूरगडाचा डोंगराळ भाग तर जिल्ह्याच्या उत्तरे कडील भाग उंच असून या उंच भागांना चिमूर पेरजागड मुल टेकड्या म्हणतात. राजुरा तालुक्यात दक्षिण दिशेला चांदूरगड नावाचे डोंगर आहे. मुल आणि चिमूर या दोन टेकड्यांच्या रांगामुळे वर्धा आणि वैनगंगा नद्याचा पाणलोट क्षेत्राची विभागणी झाली आहे.

**हवामान व पर्जन्य**

सर्वसाधारणपणे जिल्ह्याचे हवामान विषम आहे. म्हणजेच उन्हाळयात तीव्र उष्ण व हिवाळयात अति थंड आहे. येथील सर्वाधिक व सर्वात कमी तापमानाची नोंद अनुक्रमे ४८.४ सेल्सिअस व २.८ सेल्सियस केली आहे. जिल्ह्यात चंद्रपूर व ब्रह्मपुरी येथे दोन हवामान केंद्रे आहेत. जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ११४२.१ मि. मि. आहे.

**जमीन व तिचे प्रकार**

जिल्ह्यात जमिनीचे विविध प्रकार असून ती काळी, कन्हाळ, मोरांड,रेताड किंवा बरडी आणि पांढरी या स्थानिक नावाने ओळखले जातात. वर्धा नदीच्या खोऱ्यातील काळया कसदार जमिनीत कापूस, गहू ,डाळी, सोयाबीन, ज्वारी अशा प्रकारची पिके तर वैनगंगा खोऱ्यातील काळसर जमीनत प्रामुख्याने भाताची पीक घेण्यात येते.

**वने**

जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३५ टक्क्याहून अधिक क्षेत्र वनव्याप्त आहे. वनाचा विचार करता गडचिरोली व नंदुरबार या जिल्ह्यानंतर तिसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा जिल्हा आहे. विविध प्रकारच्या वन उत्पादनाचा विचार करता जिल्हा समृद्ध आहे. उत्तम प्रकारचे सागवान, तेंदूची पाने, बांबू ,मोहाची फुले ही येथे प्रमुख वन उत्पादने होते. जिल्ह्यात ताडोबा येथे राष्ट्रीय उद्यान असून अंधारी तेथे अभारण्या आहे.

**खनिजे**

खनिज दृष्ट्या समृद्ध जिल्हा वर्धा खोरे दगडी कोळशाच्या दृष्टीने महत्त्वाचे क्षेत्र आहे. चंद्रपूर तालुक्यात चंद्रपूर, घुगुस, व बल्लारपूर राजुरा तालुक्यात सास्ती, भदावती तालुक्यात माजरी ,वरोडा तालुक्यातील वारोडा येथे दगडी कोळसाच्या खाणी आहे. राज्यातील इतर कोणत्याही जिल्ह्यापेक्षा या जिल्ह्यामध्ये तांब्याचे सर्वाधिक साठे आहेत. सिमेंट कारखाने असल्याचे दिसून येतात.

**तालुका निहाय लाभार्थ्यांचे अध्ययन**

पुढील तक्त्यात तालुका निहाय ग्रामीण व नागरी क्षेत्रातील लाभार्थ्यांचे पूर्ण केलेल्या घरकुलाची अध्ययन करण्यात येतात आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

तक्ता क्र. १

**प्रधानमंत्री आवास योजना**

| जिल्हा :- चंद्रपूर | | | | | | | | संदर्भ वर्ष : १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तालुका | | मंजूर केलेल्या घरकुलांची संख्या | | | | | पूर्ण झालेल्या घरकुलांची संख्या | | | | |
| | | | अनुसूचीत जाती | अनुसुचित जमाती | अल्पसंख्यांक | इतर | एकुण | अनुसूचीत जाती | अनुसुचित जमाती | अल्पसंख्यांक | इतर | एकुण |
| (१) | (२) | | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) |
| १ | वरोरा | ग्रामिण | ३५ | १२४ | ० | ६९ | २२८ | ३२ | ९५ | ० | १९० | ३१७ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ५ | ९ |
| २ | चिमूर | ग्रामिण | ११२ | ३८७ | ० | १९३ | ६९२ | १३४ | ४०१ | ० | ८०२ | १३३७ |
| | | नागरी | ९३ | २६० | २५ | ३१५ | ६९३ | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | नागभिड | ग्रामिण | ८४ | २४६ | ० | १९६ | ५२६ | ७६ | २२६ | ० | ४५२ | ७५४ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | १ | ५ |
| ४ | ब्रम्हपूरी | ग्रामिण | ४८ | २२९ | ० | ८०० | १०७७ | २०२ | ६०६ | ० | ११४३ | १९५१ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | सावली | ग्रामिण | १८३ | ३७० | ० | ४०६ | ९५९ | ४१ | १२२ | ० | २४४ | ४०७ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | सिंदेवाही | ग्रामिण | ५८ | ५३५ | ० | २९१ | ८८४ | ३८ | ११४ | ० | २२९ | ३८१ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ९ | १ | ० | ३३ | ४३ |
| ७ | भद्रावती | ग्रामिण | ४६ | २३६ | ० | १२९ | ४११ | ८ | २५ | ० | ५० | ८३ |
| | | नागरी | २४ | ७ | ० | ९१ | १२२ | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | चंद्रपूर | ग्रामिण | ३४ | ९५ | ० | ६४ | १९३ | २४ | ७३ | ० | १४६ | २४३ |
| | | नागरी | १८४ | ८९ | ० | ७८६ | १०५९ | ११ | १ | ० | ३२ | ४४ |
| ९ | मूल | ग्रामिण | ५३ | ३२८ | ० | ३४८ | ७२९ | २ | ७ | ० | १३ | २२ |
| | | नागरी | २ | ० | ० | ९ | ११ | ० | ० | ० | ० | ० |
| १० | पोंभूर्णा | ग्रामिण | २९ | २३४ | ० | २०६ | ४६९ | २१ | ६२ | ० | १२४ | २०७ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | बल्लारपूर | ग्रामिण | ४२ | १७१ | ० | ८२ | २९५ | ० | ० | ० | १ | १ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | कोरपना | ग्रामिण | २३ | १४२ | ० | ५९ | २२४ | ६ | १८ | ० | ३६ | ६० |
| | | नागरी | २ | ० | १ | ७ | १० | ७ | ४ | ४ | ५५ | ७० |
| १३ | राजूरा | ग्रामिण | १३७ | २६३ | ० | १७८ | ५७८ | १६ | ४८ | ० | ९६ | १६० |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | गोंडपिपरी | ग्रामिण | १२० | ३४३ | ० | ३९२ | ८५५ | १८ | ५५ | ० | ११० | १८३ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ४ | ११ | २ | ४८ | ६५ |
| १५ | जिवती | ग्रामिण | ७९ | १२८ | ० | ११६ | ३२३ | ४८ | १४५ | ० | २९० | ४८३ |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **जिल्हा एकूण** | | **ग्रामिण** | **१०८३** | **३८३१** | **०** | **३५२९** | **८४४३** | **६६६** | **१९९७** | **०** | **३९२६** | **६५८९** |
| | | **नागरी** | **३०५** | **३५६** | **२६** | **१२०८** | **१८९५** | **३५** | **२०** | **७** | **१७४** | **२३६** |

**प्रधानमंत्री आवास योजना म्हणजे काय?**

केंद्रातील एकापाठोपाठ एक सरकारे सन १९९० पासून भारतातील गृहनिर्माण समस्या सोडवण्यासाठी योजना तयार करून प्रयत्न करीत आहे. उदा. इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व राजीव आवास योजना असे असले तरी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सुद्धा ही समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न केले असून प्रधानमंत्री आवास योजना हे या प्रयत्नाचे फलित आहे. सन २०१५ मध्ये विकेंद्रीत कार्यक्रम जाहीर करण्यासाठी एक धाडसी पाऊल उचलले ज्या अंतर्गत सरकारने भारतातील प्रत्येक नागरिकाला घरे देण्याचे आश्वासन दिले या भव्य योजनेला आपण प्रधानमंत्री आवास योजना म्हणून ओळखतो. १ जून २०१५ रोजी सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री आवास योजना शहरी तसेच ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित करून भारतातील घरांची कमतरता दूर करण्याचे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

उद्दिष्ट आहे. अशाप्रकारे प्रधानमंत्री आवास योजना शहरी व प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण ज्यांना औपचारिकपणे अशा दोन नावाने ओळखले जातात.

**प्रधानमंत्री आवास योजनेचा उद्देश्य**

(१) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे पुरवणे.

(२) सर्व आर्थिक कमजोर घटकांसाठी (एस. सी.,एस टी., महिला, अपंग) पक्के घर पुरवणे.

(३) घरकुल योजना अंतर्गत गृह कर्ज उपलब्ध करून देणे.

(४) आवासाची प्रमुख महिला असेल व कुटुंबात महिला नसेल तर प्रमुख पुरुष असेल.

(५) वृद्ध व अपंग यांच्याकरिता त्यांच्या सोयीनुसार जागा उपलब्ध करून देणे.

(६) नाविन्यपूर्ण तांत्रिकदृष्ट्या सुख सोयीकरिता आवास उपलब्ध करून देणे.

**प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्रता**

1. पती ,पत्नी आणि अविवाहित मुलांचे कुटुंब हे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निर्धारित केलेल्या मापदंडानुसार घर मानले जाते. या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थीकडे भारताच्या कोणत्याही भागात त्यांच्या नावावर किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावावर पक्के घर नसावे.
2. २१ चौरस मीटर पेक्षा कमी पक्के घर असलेल्या लोकांना सध्याच्या घराच्या वाढीमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते.
3. कुटुंबातील पौढ कमावत्या सदस्यांना स्वातंत्र कुटुंब मानले जाते आणि अशा प्रकारे त्यांच्या वैवाहिक स्थितीकडे दुर्लक्ष करून योजनेचे लाभार्थी मानले जातात.
4. विवाहित जोडप्यांच्या बाबतीत पती-पत्नीपैकी एक किंवा दोघेही एकत्रित मालकीमध्ये एकाच घरासाठी पात्र असतील जर त्यांनी योजनेअंतर्गत कुटुंबाच्या उत्पन्नाच्या पात्रतेचा निकषांची पूजा केली असेल.
5. ईडब्ल्यूएस (EWS) श्रेणीतील लाभार्थी मिशनच्या चारही अनुलंबामध्ये मदतीसाठी पात्र आहे तर एलआयजी/एमआयजी श्रेणी केवळ मिशनच्या सीएलएसएस (CLSS) घटकापर्यंत पात्र आहेत.

**प्रधानमंत्री आवास योजना क्रेडिट लिंक सबसिडी योजना**

क्रेडिट लिंक सबसिडी स्कीम अंतर्गत कर्जदार त्यांच्या एकूण गृह कर्जातून काही रक्कम अनुदानातील दराने मिळवू शकतात, ते ज्या खरेदीदार श्रेणीमध्ये येतात त्यानुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे

1. ज्यांचे उत्पन्न तीन लाखापर्यंत आहे अशा प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ईडब्ल्यूएस श्रेणी परिभाषित केलेल्या खरेदीदारांनी त्यांच्या ६ लाखापर्यंतच्या कर्जाच्या रकमेवर ६.५% व्याज अनुदान मिळते.
2. ज्यांचे उत्पन्न ३ लाख ते ६ लाख पर्यंत आहे अशा प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत एलआयजी परिभाषित केलेल्या खरेदीदाराने त्यांच्या ६ लाखापर्यंतच्या गरजेच्या रकमेवर 6.5% व्याज अनुदान मिळते.
3. ज्यांचे उत्पन्न ६ लाख ते १२ लाखापर्यंत आहे अशा प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत एमआयजी श्रेणी-१ परिभाषित केलेल्या खरेदीदारांनी त्यांच्या ९ लाखापर्यंतच्या कर्जाच्या रकमेवर ४ टक्के व्याज अनुदान मिळते.
4. ज्यांचे उत्पन्न बाजार १२ लाख ते १८ लाख पर्यंत आहे अशा प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत एमआयजी-२ श्रेणी परिभाषित केलेल्या खरेदीदारांनी त्यांच्या १२ लाखापर्यंतच्या कर्जाच्या रकमेवर ३ टक्के व्याज अनुदान मिळतात.

**प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत झालेला खर्च**

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जातीनिहाय करण्यात आलेला खर्च पुढील तक्त्या दर्शविण्यात येत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

तक्ता क्र. २

**प्रधानमंत्री आवास योजना**

| जिल्हा :- चंद्रपूर | | | | | | | | संदर्भ वर्ष : १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | | झालेला खर्च (संदर्भ वर्षातील) ₹ लाखात | | | | | योजनेच्या सुरूवातीपासून संदर्भ वर्षापर्यंत | |
| | | | अनुसूचीत जाती | अनुसूचित जमाती | अल्पसंख्यांक | इतर | एकुण | एकुण पुर्ण झालेली घरकुले | झालेला खर्च (₹ लाखात) |
| (१) | (२) | | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) |
| १ | वरोरा | ग्रामिण | ४१.६० | १२३.५० | ० | २४७.०० | ४१२.१० | १२२७ | १५९५.१० |
| | | नागरी | २.३० | ०.९० | १.५० | ७.१ | ११.८० | २९ | १०७.४० |
| २ | चिमूर | ग्रामिण | १७४.२० | ५२१.३० | ० | १०४२.६० | १७३८.१० | ३९२१ | ५०९७.३० |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | नागभिड | ग्रामिण | ९८.८० | २९३.८० | ० | ५८७.६० | ९८०.२० | २२२३ | २८८९.९० |
| | | नागरी | २५.०० | ३६.०० | ० | ३६ | ९७.०० | ४५ | ३०२.०६ |
| ४ | ब्रम्हपूरी | ग्रामिण | २६२.६० | ७८७.८० | ० | १४८५.९० | २५३६.३० | ४३५५ | ५६६१.५० |
| | | नागरी | ० | ०.०० | ० | ० | ०.० | २४३ | ७२८.०० |
| ५ | सावली | ग्रामिण | ५३.३० | १५८.६० | ० | ३१७.२० | ५२९.१० | १५७५ | २०४७.५० |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | सिंदेवाही | ग्रामिण | ४९.४० | १४८.२० | ० | २९७.७० | ४९५.३० | १५७१ | २०४२.३० |
| | | नागरी | ७.१ | ०.४० | ० | ७८.७ | ८६.२० | ४३ | १६०.६० |
| ७ | भद्रावती | ग्रामिण | १०.४० | ३२.५० | ० | ६५.०० | १०७.९० | १०६८ | १३८८.४० |
| | | नागरी | २४.१० | ८.८० | ८.९० | ३७.९ | ७९.७० | ० | २२४.६० |
| ८ | चंद्रपूर | ग्रामिण | ३१.२० | ९४.९० | ० | १८९.८० | ३१५.९० | १३६८ | १७७८.४० |
| | | नागरी | २७.५० | ३ | ० | ८०.०० | ११०.०० | १४६ | ४८६.८० |
| ९ | मूल | ग्रामिण | २.६० | ९.१० | ० | १६.९० | २८.६० | १४६० | १८९८.०० |
| | | नागरी | २.०० | ०.४० | ०.०० | ६.८० | ९.२० | ० | २५.८० |
| १० | पोंभूर्णा | ग्रामिण | २७.३० | ८०.६० | ० | १६१.२० | २६९.१० | ७५३ | ९७८.९० |
| | | नागरी | ० | ० | ० | १५.६० | १५.६० | १६ | ४४.६० |
| ११ | बल्लारपूर | ग्रामिण | ०.०० | ०.०० | ० | १.३० | १.३० | २७३ | ३५४.९० |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ०.०० | ३९ | १०५.०० |
| १२ | कोरपना | ग्रामिण | ७.८० | २३.४० | ० | ४६.८० | ७८.०० | ५१७ | ६७२.१० |
| | | नागरी | ७२.२० | १५.४० | ५८.०० | १०८.०० | २५३.६० | ११५ | ३७३.४० |
| १३ | राजूरा | ग्रामिण | २०.८० | ६२.४० | ० | १२४.८० | २०८.०० | ७०२ | ९१२.६० |
| | | नागरी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ० | १०४ | १६०.०० |
| १४ | गोंडपिपरी | ग्रामिण | २३.४० | ७१.५० | ० | १४३.०० | २३७.९० | ११६२ | १५१०.६० |
| | | नागरी | ४.०० | ११.०० | २.०० | ४८.०० | ६५.०० | ६५ | ११५.०० |
| १५ | जिवती | ग्रामिण | ६२.४० | १८८.५० | ० | ३७७.०० | ६२७.९० | ११९५ | १५५३.५० |
| | | नागरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **जिल्हा एकूण** | | **ग्रामिण** | **८६५.८०** | **२५९६.१०** | **०** | **५१०३.८०** | **८५६५.७०** | **२३३७०** | **३०३८१.००** |
| | | **नागरी** | **१६४.२०** | **७५.४०** | **७०.४०** | **४१८.१०** | **७२८.१०** | **८४५** | **२८३३.२६** |

**प्रधानमंत्री आवास योजनेचे फायदे**

1. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामीण भागातील घरांचा गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करते ही योजना ग्रामीण कुटुंबांना घराचे बांधकाम आणि नुतनी करण्यासाठी आर्थिक मदत देऊन ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते .
2. हा उपक्रम केवल ग्रामीण कुटुंबाची राहणीमान सुधारत नाही तर स्थानिक अर्थव्यवस्थेला आधार देत ग्रामीण भागात रोजगारांच्या संधीही निर्माण करतो. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण शाश्वत आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास आणि विकासासाठी सरकारच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे.
3. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत क्रेडिट लिंक सबसिडी स्कीम समाविष्ट आहे, जी गृहकर्जावर व्याज अनुदान देते त्यामुळे लाभार्थ्यावर आर्थिक भार कमी होतो.
4. योजनेचे विविध घटक पडणारे गृहनिर्माण प्रकल्प आणि वैयक्तिक घर बांधणे किंवा जोडणे पूर्ण करतात.
5. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे महिला सक्षमीकरणाला प्राधान्य मिळत आहे.
6. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

**प्रधानमंत्री आवास योजनेचे वैशिष्ट्ये**

1. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र सरकार मार्फत मैदानी क्षेत्रात घरबांधणीसाठी १ लाख व २० हजार व पहाडी क्षेत्रासाठी १ लाख ३० हजार रुपये निधी दिला जातो. तसेच केंद्र व राज्य सरकार मार्फत या योजनेचा खर्च ७५:२५ या प्रमाणात निधी पुरवला जातो.
2. शौचालय बांधून देण्यासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १२ हजार रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येतो.
3. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उत्पन्नानुसार वर्गीकरण करून कमी व्याजाच्या दराने कर्ज घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
4. प्रधानमंत्री आवास योजने मार्फत देण्यात येणारी घरे महिलांच्या नावाने देण्यात येत आहे.
5. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे ग्रामीण भागातील बेकार वर्गांना रोजगार प्राप्त होत आहे.

**निष्कर्ष**

प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र सरकारची एक महत्वाची व सामाजिक दृष्ट्या अत्यंत उपयुक्त योजना असून "सर्वांसाठी घरे"हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने प्रभावी ठरलेली आहे. या योजनेमुळे शहरी व ग्रामीण भागातील झोपडपट्ट्यांचे प्रमाण कमी होण्यास, जीवनमान उंचावण्यास तसेच सामाजिक सुरक्षिततेची भावना वाढण्यास हातभार लागलेला आहे. थेट आर्थिक सहाय्य, व्याज सवलत योजना व पारदर्शक ऑनलाईन अंमलबजावणी यामुळे लाभार्थ्यांचा सहभाग वाढलेला दिसून येतो.

एकूणच प्रधानमंत्री आवास योजना ही गृहनिर्माण क्षेत्रात सकारात्मक बदल घडून आणणारी योजना असून योग्य नियोजन, प्रभावी देखरेख जनजागृती व स्थानिक प्रशासनाच्या सक्रिय सहभागातून या योजनेचा लाभ अधिक व्यापक व दीर्घकालीन स्वरूपात समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोचू शकतो.

**संदर्भसूची**

1. सुधीर बोधनकर, विवेक अलोणी, कुलकर्णी मृणाल (२०१४), सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
2. भारत सरकार, ग्रामीण विकास मंत्रालय PMAY-G रिपोर्ट.
3. रमेश बालवाड, आपला चंद्रपूर जिल्हा, सामान्य ज्ञान विद्याभारती प्रकाशन लातूर
4. र. रा. बोरकर (२००९) , "चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्त्व" सुयश प्रकाशन नागपूर.
5. अ. रा. राजुरकर (१९८२), चंद्रपूरचा इतिहास, चंद्रपूर महाकाली प्रकाशन.
6. संदीप राजकलम पाटील (२०१९) महाराष्ट्रातील जिल्हे, चेतन बुक्स प्रकाशन पुणे.
7. राहुल यशवंतराव निकम, आवास योजना आणि अनुसूचित जाती व जमातीचा विकास प्रथम आवृत्ती जानेवारी (२०१७) जळगाव.
8. जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन चंद्रपूर.
9. https://www housing.com.
10. https://rdd. Maharashtra gov.in